दिवाणी दावा. क्र. ३९/२०१९
माणिकलाल वि. शालीकराम
नि. क्र. २० खाली

**वादीतर्फे सरतपास शपथेवर पुढे सुरु**
**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम.व्ही. येरपुडे यांच्यामार्फत :–**

१} मी अभिलेखावर निशाणी क्र. २० वर माझे सरतपास शपथपत्र दाखल केले असून त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे माझे विधीज्ञ श्री. एम.व्ही. येरपुडे यांनी लिहीला आहे. त्यावर मी वाचून पाहून सही केली आहे. त्यातील मजकूर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे.

२} मी निशाणी क्र. २२ सोबत अनुक्रमांक १ वर मौजा दुलारा येथील वाद शेताची अधिकार अभिलेख पंजी लावली आहे. त्यावर तलाठ्याची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. २५** देण्यात येतो. मी अनुक्रमांक २ वर मौजा दुलारा येथील फेरफार क्र. ३४ ची सही–शिक्क्याची नक्कल दाखल केली आहे. त्यावर तलाठ्याचा सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. २६** देण्यात येतो. मी अनुक्रमांक ३ वर भुमापन क्र. १०० चा ७/१२ उतारा लावला आहे. त्यावर नायब तहसीलदार यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. २७** देण्यात येतो. मी अनुक्रमांक ४ वर भुमापन क्र. १०१ चा ७/१२ उतारा लावला आहे. त्यावर नायब तहसीलदार यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. २८** देण्यात येतो. मी अनुक्रमांक ५ वर भुमापन क्र. १०२ चा ७/१२ उतारा लावला आहे. त्यावर नायब तहसीलदार यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. २९** देण्यात येतो. मी अनुक्रमांक ६ वर भुमापन क्र. १९९ चा ७/१२ उतारा लावला आहे. त्यावर नायब तहसीलदार यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. ३०** देण्यात येतो. मी अनुक्रमांक ७ वर भुमापन क्र. २३३ चा ७/१२ उतारा लावला आहे. त्यावर नायब तहसीलदार यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. ३१** देण्यात येतो. मी अनुक्रमांक ८ वर भुमापन क्र. २४६ चा ७/१२ उतारा लावला आहे. त्यावर नायब तहसीलदार यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. ३२** देण्यात येतो. मी अनुक्रमांक ९ वर वादी व प्रतिवादी यांच्या नांवाची फेरफार क्र. १०३३ चा उतारा जोडला आहे. त्यावर तलाठी यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. ३३** देण्यात येतो. मी

अनुक्रमांक १० ते १५ वर वरील सर्वे नंबरचे ७/१२ उतारे लावले आहेत. त्यावर वादी व प्रतिवादी यांच्या नांवाची नोंद लागलेली आहे. त्यावर नायब तहसीलदार यांची सही व शिक्का आहे. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. ३४ ते ३९** देण्यात येतो. मी अनुक्रमांक १६ व १७ वर वाद शेतजमिनीचे नकाशाची प्रत लावली आहे. त्यावर तलाठी यांची सही व शिक्का आहे. त्यास **निशाणी क्र. ४० व ४१** देण्यात येतो. मी अनुक्रमांक १८ व १९ वर माझी पत्नी कलाबाई माणिकलाल वरखडे हिने शालीकराम वरखडे हिच्याविरुद्ध दिलेल्या तक्रारींची एनसीआरची प्रत दाखल केलेली आहे. त्यावर पोलीस स्टेशन ऑफीसर यांची सही आहे. त्यास **निशाणी क्र. ४२ व ४३** देण्यात येतो. मी माझ्या वकिलांमार्फत प्रतिवादीला दिनांक २९/०७/२०१९ रोजी नोटीस पाठवली होती. त्याची प्रत मी अनुक्रमांक २० वर दाखल केलेली आहे. त्यावर माझ्या वकिलांची सही आहे. त्यातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला होता. त्यास **निशाणी क्र. ४४** देण्यात येतो. मी अनुक्रमांक २१ वर सदरची नोटीस प्रतिवादीला पोस्टाने पाठवल्याबाबत अनुक्रमांक २१ वर ६ पावत्या जोडल्या आहेत. सदरची पावत्या पोस्ट ऑफीसने दिलेल्या आहे. त्यास **निशाणी क्र. ४५** देण्यात येतो. प्रतिवादीला माझ्या वकिलांनी पाठवलेली नोटीस मिळाल्याबाबत मी अनुक्रमांक २२ वर एकूण ४ पोस्टाच्या पोचपावत्या जोडल्या आहेत. त्यास अनुक्रमे **निशाणी क्र. ४६ ते ४९** देण्यात येतो. मी अनुक्रमांक २३ वर प्रतिवादीला दिलेली नोटीस त्याने घेतली नसल्याने परत आलेला लिफाफा जोडला आहे. त्यास **निशाणी क्र. ५०** देण्यात येतो. (वादीच्या विधीज्ञाने आणखी काही कागदपत्रे दाखल करायची असल्याने सरतपासास पुढील मुदत मागितली. त्यामुळे सरतपास तहकुब.)

सरतपास अपूर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

रामटेक. (एच.एस.सातपुते)
दिनांक : ०५/०७/२०२३. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक.

दिवाणी दावा. क्र. ३९/२०१९
माणिकलाल वि. शालीकराम
नि. क्र. २० खाली

**वादीतर्फे जादा सरतपास शपथेवर पुन्हा सुरु**

**सरतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम.व्ही. येरपुडे यांच्यामार्फत :-**

३}     पाचीबाई ही मयत झाल्यामुळे वादशेतावरील तिचे नाव कमी केल्याबाबतचे मी फेरफाराच्या नोंदवहीच्या पत्रकाची सत्यप्रत दाखल केली आहे. त्यावर मंडळ अधिकारी देवलापार यांची सही आहे. त्यास **निशाणी क्र. ५३** देण्यात येतो. मी शेत सव्हे क्र. १०२ बाबत मुनीयाबाई व पाचीबाई यांनी करुन दिलेल्या मृत्यूपत्राच्या सत्यप्रती दाखल केलेल्या आहेत. त्यावर दुय्यम निबंधक, रामटेक यांचा सही व शिक्का आहे. त्यास **आर्टीकल अ** देण्यात येतो. मी शेत सव्हे क्र. २४६ बाबत मुनीयाबाई व पाचीबाई यांनी करुन दिलेल्या मृत्यूपत्राच्या सत्यप्रती दाखल केलेल्या आहेत. त्यावर दुय्यम निबंधक, रामटेक यांचा सही व शिक्का आहे. त्यास **आर्टीकल ब** देण्यात येतो.

सरतपास पुर्ण

**उलटतपास प्रतिवादींतर्फे ॲडव्होकेट ए.जी. महाजन यांच्यामार्फतः-**

(उलट तपास प्रतिवादीचे विधीज्ञ यांच्या तोंडी विनंतीवरुन पुढील तारखेपर्यंत तहकुब.)

श्रवणोत्तर स्वीकृत,          माझे समक्ष,

रामटेक.          (एच.एस.सातपुते)
दिनांक : २६.०७.२०२३.          सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक.